मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# दररोज पाणी देण्याचे नियोजन सहा महिन्यांत करू : महापौर रवी लांडगे

## नियमित पाणीपुरवठ्यासाठी भामा-आसखेड धरणातून येणाऱ्या जलवाहिनीचे काम पूर्ण करण्यास प्राधान्य देऊ.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे.नियमितपाणीपुरवठ्यासाठी भामा-आसखेड धरणातून येणाऱ्या जलवाहिनीचे काम पूर्ण करण्यास प्राधान्य देऊ. पवना बंदिस्त जलवाहिनीबाबत मावळातील बाधित शेतकरी, लोकप्रतिनिधींशी संवाद साधून, प्रशासकीय अडथळे दूर करून प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करू. दररोज पाणी देण्याचे नियोजन सहा महिन्यांत करू, असा निर्धार नूतन महापौर रवी लांडगे यांनी व्यक्त केला. पिंपरी-चिंचवड कार्यालयात महापौर लांडगे यांनी पाणी, कचरा, रस्ते, पर्यावरण आणि आर्थिक शिस्त याबाबत ठोस भूमिका स्पष्ट केली.



ते म्हणाले की, भामा-आसखेडच्या जलवाहिनीचे काम पुढील सहा महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, त्यानंतर शहराला दररोज पाणी देणे शक्य होईल.सध्या प्रत्येक सोसायटीला एकच नळजोडणी दिल्याने पाणी वितरणात तफावत निर्माण होते. त्यामुळे प्रत्येक फ्लॅटला स्वतंत्र नळजोडणी देण्याचा पर्यायही तपासला जाणार आहे. नियमित पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर 'टँकर लॉबी' लाही आपोआप आळा बसेल. महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहे, खड्डेमुक्त रस्ते आणि घराघरात कचरा वर्गीकरण सक्तीचे करण्यावर भर राहील. कुदळवाडी येथील अतिक्रमणांवरील कारवाईनंतर आता लघु उद्योजकांशी चर्चा करून त्यांच्या पुनर्वसनाचा मार्ग काढला जाईल.

### नवीन विकासकामे निधी तपासूनच

» महापौर रवी लांडगे म्हणाले की, दुर्गा टेकडीवर ऑक्सिजन पार्क उभारणी, मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि हरित शहर संकल्पनेवर भर दिला जाणार आहे. इंद्रायणी व पवना नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी दोषींवर कठोर कारवाई होईल. महापालिकेवरील कर्ज लक्षात घेऊन सुरू असलेली कामे पूर्ण करण्यावर प्राधान्य देण्यात येईल. निधी तपासूनच नवीन विकासकामे हाती घेऊ. सीएसआर निधीचा वापर आणि थकबाकी वसुलीसाठी उपाययोजना केल्या जातील.

महापौर रवी लांडगे म्हणाले की, दुर्गा टेकडीवर ऑक्सिजन पार्क उभारणी, मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि हरित शहर संकल्पनेवर भर दिला जाणार आहे. इंद्रायणी व पवना नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी दोषींवर कठोर कारवाई होईल. महापालिकेवरील कर्ज लक्षात घेऊन सुरू असलेली कामे पूर्ण करण्यावर प्राधान्य देण्यात येईल असा निर्धार नूतन महापौर रवी लांडगे यांनी व्यक्त केला. .

# बेशिस्त वाहनचालकांनो, तुमच्यावर आता सजग नागरिकांची नजर...!

## वाहतूक पोलिसांच्या 'ट्राफिक बडी' व्हॉट्सअ‍ॅप तक्रार प्रणालीवर नागरिकांनी केल्या दहा हजार तक्रारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील रस्त्यांवर वाहतूक पोलिस नसले तरी आता बेशिस्त वाहनचालकांना मोकळे रान मिळणार नाही. कारण सजग नागरिक थेट व्हॉट्सअ‍ॅपद्वारे त्यांच्या उल्लंघनाची तक्रार पोलिसांकडे करू शकतात. पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी सुरू केलेल्या 'ट्राफिक बडी' या व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट प्रणालीने हे शक्य झाले आहे. याप्रणालीद्वारे सोमवारपर्यंत (दि. १६) नऊ हजार ८७२ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

ही प्रणाली स्थान-आधारित असल्याने खोट्या तक्रारी टाळता येतात आणि नागरिकांना त्यांच्या तक्रारीवर घेण्यात येणाऱ्या कारवाईची माहितीही मिळते.ट्राफिक बडी ही एक सोपी व्हॉट्सअ‍ॅप-आधारित चॅटबॉट प्रणाली आहे. १७ जुलै २०२५ मध्ये सुरू झालेली ही सुविधा आता पूर्णपणे कार्यान्वित आहे. नागरिक ८७८८६४९८८५ या क्रमांकावर व्हॉट्सअ‍ॅप करतात. प्रणाली स्थान-आधारित (लोकेशन-बेस्ड) असल्याने तक्रारदाराच्या



स्थानाची पडताळणी होते. तक्रार नोंदविल्यानंतर पोलिसांकडून त्वरित प्रतिसाद मिळतो आणि कारवाई सुरू होते.

याप्रणालीद्वारे वाहतूक कोंडी, रस्त्यांवरील खड्डे किंवा खराब रस्ते, सिग्नल तोडणे, हेल्मेट न घालणे, अवैध पार्किंग अशा वाहतूक नियमांचे उल्लंघन झाल्यास तक्रार करता येते. या व्यतिरिक्त, रस्त्यावरील अडथळे किंवा इतर सुरक्षा-संबंधित मुद्देही नोंदविता येतात. ही प्रणाली फक्त वाहतूक विभागाशी संबंधित आहे, म्हणजे गुन्हेगारी किंवा इतर प्रकारच्या तक्रारी येथे स्वीकारल्या जात नाहीत.

### रस्त्याची तक्रार महापालिकेकडे

» रस्ते खराब असणे, खड्डे किंवा इतर दुरुस्ती-संबंधित तक्रारी ट्राफिक बडीद्वारे स्वीकारल्या जातात, पण त्या पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे पाठवल्या जातात. पोलिस महापालिकेशी समन्वय साधून दुरुस्ती करून घेतात. समस्या सुटली नाही तर मासिक फॉलो-अप घेतले जाते. यामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी तक्रार करून उपाय मिळतो. रस्त्यांसंदर्भात ३२० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

> **ट्राफिक बडी ही स्थान-आधारित प्रणाली आहे. ही राज्यातील पहिली योजना आहे. ही प्रणाली शहरातील वाहतूक व्यवस्था मजबूत करण्यासाठी महत्त्वाची ठरत आहे. सजग नागरिकांनी याचा सक्रिय वापर करावा.**
>
> **- विवेक पाटील, पोलिस उपायुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**

सर्व तक्रारी स्वीकारल्या जात नाहीत.स्थान-आधारित प्रणालीमुळे खोटी माहितीच्या तक्रारी नामंजूर होतात.

# नवी मुंबईच्या निर्णयानंतर पिंपरी-चिंचवडमध्ये स्वीकृत नगरसेवक नियम बदलणार?

## गटनेत्यांच्या स्वाक्षरीची सक्ती रद्दीच्या पार्श्वभूमीवर शहरात चर्चा; प्रशासन नियमांवर ठाम राहणार का?

**पिंपरी | प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेत स्वीकृत नगरसेवक पदासाठी गटनेत्यांच्या स्वाक्षरीची सक्ती रद्द केली आहे. त्याचे पडसाद पिंपरी-चिंचवड महापालिकेतही उमटू लागले आहेत. नवी मुंबईच्या धर्तीवर येथेही नियमांमध्ये बदल होणार का, तसेच प्रशासन नियमांवर ठाम राहणार की, राजकीय दबावापुढे झुकणार, याबाबत महापालिका वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे.

नवी मुंबई महापालिकेत स्वीकृत सदस्यपदाच्या अर्जावर गटनेत्यांची स्वाक्षरीची सक्ती तांत्रिकदृष्ट्या चुकीची असल्याचे सांगत ती मागे घेण्यात आली. या निर्णयामुळे विविध क्षेत्रांतील जाणकारांना संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे सांगितले जात आहे. पारदर्शकता व व्यापक सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. मात्र, अशा बदलांमुळे स्वीकृत सदस्यपदाचा वापर केवळ राजकीय समतोल साधण्यासाठी होणार का, असा सवालही उपस्थित होत आहे




### नवी मुंबईच्या निर्णयाचे पडसाद

**» नवी मुंबईत स्वीकृत सदस्यपदाच्या अर्जावर गटनेत्यांची स्वाक्षरी सक्तीची ठेवणे तांत्रिकदृष्ट्या अयोग्य असल्याचे सांगत ती अट मागे घेण्यात आली. या निर्णयामुळे विविध क्षेत्रांतील जाणकारांना संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे सांगितले जात आहे. पारदर्शकता आणि व्यापक सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात असला, तरी स्वीकृत सदस्यपदाचा वापर केवळ राजकीय समतोल साधण्यासाठी होणार का, असा सवालही उपस्थित होत आहे.**

विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना संधी देण्यासाठी अटी शिथिल करणे आवश्यक असल्याचे काही जणांचे म्हणणे आहे. प्रशासनातील सूत्रांच्या मते, नियमांमध्ये मनमानी बदल केल्यास प्रक्रिया पूर्णपणे राजकीय होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. नवी मुंबई महापालिकेच्या निर्णयानंतर आता पिंपरी-चिंचवडमध्येही तशीच पावले उचलली जाणार का, अधिकाऱ्या नियमांवर बोट राहणार की, राजकीय पक्षांच्या तालावर निर्णय होणार, याबाबत शहरात उत्सुकता निर्माण झाली आहे.

महापालिकेत सर्वच नगरसेवक थेट निवडणुकीतून जनतेकडून निवडून येत नाहीत. काही सदस्यांना त्यांच्या विशिष्ट क्षेत्रातील कामगिरी, अनुभव आणि तज्ज्ञतेच्या आधारे सभागृहात नामनिर्देशित केले जाते. स्वीकृत नगरसेवकसाठी समाजकार्य, शिक्षण, आरोग्य, नगर रचना, कायदा, पर्यावरण, क्रीडा, कला व संस्कृती आदी क्षेत्रांतील तज्ज्ञांना संधी देण्यात येते. अशा सदस्यांना स्वीकृत नगरसेवक म्हटले जाते. पिंपरी-चिंचवड महापालिकेत ही संख्या पूर्वी पाच होती. मात्र, सन 2023 मधील दुरुस्तीनंतर ती 10 पर्यंत वाढवण्यात आली. या दुरुस्तीनंतर स्वीकृत नगरसेवकांना मतदानाचा अधिकार मिळाल्यामुळे ते सत्तासमीकरणावर प्रभाव टाकू शकतात. त्यामुळे त्यांच्या राजकीय महत्त्वात लक्षणीय वाढ झाली आहे.

राजकीय पक्षांकडून तज्ज्ञांना संधी न देता पराभूत नगरसेवक, माजी नगरसेवक, पक्षाचे पदाधिकारी व समर्थकांना स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी दिले जाते. राजकीय पुनर्वसन करण्यासाठी प्रत्येक पक्षांकडून त्या पदाचा वापर केला जातो, हा आत्तापर्यंतचा अनुभव आहे. त्याला यंदा तडा जाणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### पक्षांकडून केली जाते नावांची शिफारस

**» स्वीकृत नगरसेवक पदासाठी सत्ताधारी पक्ष किंवा विरोधी पक्षांकडून संभाव्य नावांची शिफारस केली जाते. महापौर त्या नावांची अधिकृत शिफारस करतात. राज्य सरकार त्याला अंतिम मंजुरी देते. त्यानंतर स्वीकृत नगरसेवक म्हणून त्यांना मान्यता मिळते. सभागृहात उपस्थित राहून चर्चेत सहभागी होत त्यांना मत मांडण्याचा अधिकार असतो. समित्यांच्या निवडीत सहभागी होण्याचा अधिकार तसेच, 2023 नंतरच्या दुरुस्तीनुसार मतदानाचा अधिकारही देण्यात आला आहे. निवडून आलेल्या नगरसेवकांना त्यांच्या प्रभागासाठी विकास निधी दिला जातो. मात्र, स्वीकृत नगरसेवक कोणत्याही विशिष्ट प्रभागाचे प्रतिनिधित्व करत नसल्यामुळे त्यांना स्वतंत्र विकास निधी दिला जात नाही.**

### त्यासंदर्भात आयुक्त निर्णय घेतील

**» स्वीकृत नगरसेवकांच्या शिफारशीचा निर्णय महापौर आणि आयुक्तांच्या अखत्यारीतील विषय आहे. त्याबाबत आयुक्तच निर्णय घेतील, असे महापालिकेचे नगर सचिव मुकेश कोळप यांनी सांगितले.**

# इंद्रायणी-पवना नदी सुधार प्रकल्पासाठी लवकरच निविदा; 27 गावांसाठी ₹976 कोटींचा एसटीपी उपक्रम

## पीएमआरडीएकडून ₹826 कोटींचा नदी सुधार प्रकल्प; सांडपाणी प्रक्रिया केंद्रांमुळे नदी प्रदूषणावर आळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील महत्त्वाच्या नद्यांपैकी इंद्रायणी व पवना नदी सुधार प्रकल्प पीएमआरडीएने हाती घेतला असून, या प्रकल्पासाठीच्या निविदा पुढील आठवड्यात प्रसिद्ध करण्याची तयारी प्रशासनाकडून सुरू आहे. सर्व प्रक्रिया सुरळीत पार पडल्यास येत्या दोन महिन्यांत नदी सुधार प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पासाठी साधारण 826 कोटी रुपयांच्या निविदा असतील.




या प्रकल्पाबरोबरच पीएमआरडीएच्या हद्दीतील गावांसाठी मैला व सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. खेड, मावळ, मुळशी, हवेली आणि शिरूर या पाच तालुक्यांतील एकूण 27 गावांमध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्रे, सिव्हर नेटवर्क आणि संबंधित कामांसाठी तब्बल 976 कोटी 17 लाख 79 हजार 566 रुपयांच्या पाच स्वतंत्र निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. त्यातील काही निविदा भरल्या असून, लवकरच त्यावर कार्यवाही होणार असल्याची माहिती पीएमआरडीएने दिली.

या प्रकल्पांतर्गत डिझाईन, पुरवठा, बांधकाम, उभारणी व कार्यान्वयन यासह पाच वर्षे संचालन व देखभाल (ओ अँड एम) तसेच पाच वर्षांचा डिफेक्ट लाएबिलिटी पिरियड (डीएलपी) कंत्राटदारावर राहणार आहे. दीड महिन्यांच्या निविदा प्रक्रियेनंतर कंत्राटदारांची नियुक्ती करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाणार आहे. खेड तालुक्यातील सात गावांसाठी तीन क्लस्टरमध्ये 135 कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली आहे. मावळ तालुक्यातील दोन गावांसाठी 453 कोटी रुपयांची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

मुळशी तालुक्यातील सहा गावांसाठी 272 कोटी रुपयांचा तर हवेली तालुक्यातील आठ गावांसाठी पाच क्लस्टरमध्ये 320कोटी रुपयांचा प्रकल्प हाती घेतला जाणार आहे. शिरूर तालुक्यातील चार गावांसाठी 244 कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली आहे. या सर्व निविदांची एकत्रित किंमत 976 कोटी 17 लाख 79 हजार 566 रुपये इतकी असून, ग्रामीण व उपनगरी भागातील सांडपाणी व्यवस्थापन सुधारण्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

### नदी प्रदूषणाला बसणार आळा

**» या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांमुळे मैला व सांडपाणी थेट नद्यांमध्ये सोडले जाणार नाही. गावांमधील सांडपाणी प्रक्रिया करूनच पुढे सोडण्यात येणार असल्याने पुणे महानगर हद्दीतील नद्यांचे प्रदूषण कमी होण्यास मोठी मदत होणार आहे. विशेषतः इंद्रायणी, पवना आणि मुळा नद्यांमधील वाढते प्रदूषण लक्षात घेता हे प्रकल्प महत्त्वाचे मानले जात आहेत. पर्यावरण संरक्षणासोबतच नदीपात्र आणि भूजल गुणवत्ता सुधारण्यासही या उपक्रमाचा फायदा होणार आहे.**

# पाणीपुरवठ्याबाबत क्षेत्रीय कार्यालयनिहाय बैठका घेण्याचे महापौरांचे आदेश

## महापौर मंजुषा नागपुरे यांनी क्षेत्रीय कार्यालयनिहाय पाणीपुरवठ्याचा आढावा घेण्यासाठी नगरसेवक आणि संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेण्याचे निर्देश दिले.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहर आणि उपनगरांमध्ये सध्या अपुरा तसेच कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार समोर येत आहे. अनेक भागांत प्रतिव्यक्ती दहा लिटरही पाणी मिळत नसल्याची स्थिती आहे. याशिवाय पिण्याच्या पाण्यात सांडपाण्याची मिसळ होत असल्याच्या तक्रारी वाढल्या असून दूषित पाण्यामुळे नागरिकांना उलटी, जुलाब आणि अतिसाराचा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवकांनी अशुद्ध व कमी दाबाच्या पाणीपुरवठ्यावरून महापालिका प्रशासनाला चांगलेच जाब विचारला. परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत महापौर मंजुषा नागपुरे यांनी क्षेत्रीय कार्यालयनिहाय पाणीपुरवठ्याचा आढावा घेण्यासाठी नगरसेवक आणि संबंधित अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेण्याचे निर्देश दिले.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेला सुरवात झाल्यानंतर राष्ट्रवादीच्या (अजित पवार) नगरसेविका प्रिया गदादे यांनी जनता वसाहतमधील ड्रेनेज आणि पाणीपुरवठ्याबाबत मुद्दा उपस्थित केला. कोंढवा, महंमदवाडीसह समाविष्ट गावांमध्ये पाणीपुरवठा अपुरा होत आहे. किमान अर्धा ते एक तास पाणी मिळणे अपेक्षित आहे; परंतु प्रतिव्यक्ती १० लिटर देखील पाणी मिळत नाही. त्यामुळे टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. काँग्रेसचे प्रशांत जगताप, राष्ट्रवादीचे हाजी गफूर पठाण, वैशाली बनकर, सूरज लोखंडे, अश्विनी लांडगे, भाजपचे हरिदास चरवड, प्राची आल्हाट, दिलीप वेडे पाटील, ॲड. प्रसन्न जगताप यांचा समावेश होता




### शहराच्या पाणीप्रश्नावर मुख्यमंत्र्यांनी तोडगा काढवा : खासदार सुप्रिया सुळे

» खासदार सुप्रिया सुळे यांनी पुणे महानगरपालिकेत भेट दिली, पुणे शहराच्या पाण्यावरून आणि पाणी बिलाच्या थकबाकीवरून महापालिका आणि जलसंपदा विभाग यांच्यामध्ये सुरू झालेल्या वादावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालून तोडगा काढवा, असे मत राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले आहे. शासनाच्या दोन विभागांमध्ये अशा प्रकारे वाद निर्माण होणे योग्य नाही, त्यामुळे याबाबत आपण मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणार असल्याचेही त्यांनी नमूद केले..

बारामती लोकसभा मतदारसंघातील आणि पुणे महापालिकेच्या हद्दीत असलेल्या भागातील विविध नागरी प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी खा. सुळे यांनी मंगळवारी महापालिका आयुक्तांची भेट घेतली. यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील, महापालिकेतील गटनेते काका चव्हाण यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व नगरसेवक उपस्थित होते. महापालिका अधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी पाण्यावरून निर्माण झालेल्या महापालिका व जलसंपदा विभागातील वादावर मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालण्याची मागणी केली.

### ड्रेनेज व पाण्याची लाइन एकत्रच

» कोंढवा भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीची दुरुस्ती मंगळवारी पूर्ण करण्यात आली आहे. उपनगरातील विविध भागांत आतापर्यंत १४ पाण्याच्या टाक्यांची कामे पूर्ण झाली आहेत. मात्र काही ठिकाणी रस्ते खोदकामास परवानगी किंवा तांत्रिक अडचणी असल्याने जलवाहिनी टाकण्याचे काम अद्याप प्रलंबित आहे. दरम्यान, ड्रेनेज आणि पिण्याच्या पाण्याच्या लाइन एकत्र आल्यामुळे पाणी दूषित होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. यानुसार अशा सुमारे ६० ते ७० ठिकाणांची ओळख पटवण्यात आली असून त्या ठिकाणी स्वतंत्र लाइन टाकण्यासाठी लवकरच निविदा प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. पालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांसाठी स्वतंत्र पाणीपुरवठा आराखडा तयार करण्यात आला आहे. तसेच शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेता राज्य सरकारकडे पाणीपुरवठ्याचा वाढीव कोटा मंजूर करण्याची मागणी करण्यात आल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी दिली.

### पुण्यात पाणीटंचाईचा प्रश्न ऐरणीवर

» शहर आणि उपनगरांमध्ये सध्या अपुरा तसेच कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. अनेक भागांत प्रतिव्यक्ती दहा लिटरही पाणी मिळत नसल्याची स्थिती निर्माण झाली असून नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. काही ठिकाणी पिण्याच्या पाण्यात सांडपाण्याची मिसळ होत असल्याच्या तक्रारी समोर आल्याने आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. दूषित पाण्यामुळे उलटी, जुलाब आणि अतिसाराचे रुग्ण वाढत असल्याची माहिती मिळत आहे.

# विद्यापीठ उड्डाणपुलाच्या कामात त्रुटी, पीएमआरडीएचे टाटा समूहाला तातडीचे पत्र

## पुणे विद्यापीठ चौकातील उड्डाणपुलाचे काम सुरक्षेच्या कारणास्तव किरकोळ दुरुस्तीचे आदेश देण्यात आले आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

'बहुप्रतीक्षित हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो आणि आचार्य आनंदऋषीजी चौकातील दुमजली उड्डाणपुलाचे संरचनात्मक कामे उच्च दर्जाची आणि व्यवस्थित झाली आहेत. मात्र, किरकोळ कामांमध्ये त्रुटी आणि उर्वरित कामे प्रलंबित असल्याने याबाबत तातडीने कार्यवाही करून दुरुस्ती करावी,' असे आदेश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) 'टाटा सिमेन्स' कंपनीला दिले आहेत. दरम्यान, ही कामे झाल्यानंतरच दुहेरी उड्डाणपुलाची दुसरी बाजू सुरू करण्याबाबतचे निर्देश पत्राद्वारे दिले आहेत.



हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पांतर्गत आचार्य आनंदऋषीजी (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रवेशद्वार) चौकात दुमजली उड्डाणपूल प्रस्तावित आहे. औंध ते शिवाजीनगर दिशेने येणाऱ्या बाजूचे काम पूर्ण झाल्याने गेल्या वर्षी २० ऑगस्टला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, तर तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत उद्घाटन करून ही बाजू खुली करण्यात आली.

बाणेरकडील बाजूही वाहतुकीसाठी सुरू करण्यात येणार असताना आणि मेट्रो मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात असताना अनेक ठिकाणी असुरक्षित साहित्य, राडारोडा, अयोग्यरित्या साठवलेली उपकरणे, अनावश्यक लोखंडी अडथळे अद्याप पुलाखाली पडून आहे. यामुळे वाहतुकीला अडथळा होत आहे. त्याबरोबरच प्रवाशांना इजा, अपघात होण्याची शक्यताही नाकारता येत नसल्याने आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी या पुलाच्या कामाचे स्थापत्य लेखापरीक्षण आणि सुरक्षात्मक लेखापरीक्षण करावे, असे पत्र 'पीएमआरडीए'ला पाठवले होते.

या पार्श्वभूमीवर 'पीएमआरडीए'ने टाटा सिमेन्स कंपनीला पत्र पाठवून मेट्रो आणि उड्डाणपुलाची कामे तातडीने पूर्ण करून किरकोळ कामांच्या ठिकाणी असलेल्या दुरुस्ती करून घ्यावी, असे पत्र पाठवून निर्देश दिले आहेत.

> हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्ग, स्थानके आणि दुहेरी उड्डाणपूल यांची कामे सुरू असून संरचनात्मक कामे व्यवस्थित झाली आहेत. किरकोळ कामांबाबत काहीशा त्रुटी असून, त्यांच्या दुरुस्तीसाठी टाटा सिमेन्स कंपनीला पत्र पाठविले आहे. ही किरकोळ कामे वेळेत पूर्ण करण्यात येतील.
>
> - रिनाज पठाण, मुख्य अभियंता, पीएमआरडीए

# समाविष्ट गावांच्या मिळकतकरासाठी विशेष सभा

## करवाढ स्थगित असतानाही विकास अडकला; नगरसेवकांनी विशेष सभेत निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

समाविष्ट गावांतील मिळकतकराच्या वसुलीसाठी स्थगिती असतानाही अभय योजना राबवली जात आहे. समाविष्ट गावांमधील मिळकतकरासंदर्भात नेमलेल्या समितीने काय शिफारशी केल्या आणि मिळकतकराची प्रचलित पद्धत काय आहे. याबाबत सभागृहाला सविस्तर माहिती होण्यासाठी केवळ समाविष्ट गावांतील मिळकतकरासाठी विशेष सभा बोलवावी. ही सभा स्थायी समितीचे अंदाजपत्रक सादर होण्यापूर्वी घ्या. तसेच, मिळकतकराच्या कक्षेतून सुटलेल्या मिळकतींना कर आकारण्यासाठी कर विभागाचे मनुष्यबळ वाढवा, अशी मागणी नगरसेवकांनी केली.

सर्वसाधारण सभेत पाच टक्के मिळकतकर वाढीचा प्रस्ताव फेटाळल्यानंतर सभागृहात या निर्णयाचे स्वागत करीत समाविष्ट गावांतील करवसुलीसंदर्भात तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली. ही गावे महापालिकेच्या हद्दीत आल्यावर या गावांतून करवसुलीला स्थगिती देण्यात आली होती. यामुळे या गावांचा विकास रखडला आहे. गावातील अनेक नागरिकांनी कर भरला तरीही त्यांना सुविधा दिल्या जात नाहीत. आता आम्ही शहरात आलो असून आम्हाला समाविष्ट म्हणू नये अशी भूमिका देखील समाविष्ट गावातून निवडून आलेल्या नगरसेवकांनी घेतली. याबाबत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे गटनेते काका चव्हाण म्हणाले, समाविष्ट गावातील करासंदर्भात तातडीने निर्णय घेण्यात यावा.

जर त्यांच्याकडून करवसुली करायची असेल तर अभय योजना संपण्याच्या आधी निर्णय झाल्यास या योजनेचा फायदा त्यांना घेता येईल. सध्या या गावांची अवस्था डस्टबिनसारखी झाली आहे. कचरा, पाणी, रस्ते असे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. 48 टक्के करवाढ न करता ग्रामपंचायत कराच्या दोन टक्के करवाढ झाली तर मी याचे स्वागत करेन. सभागृह नेते गणेश बीडकर म्हणाले, शहरातील विकासकामांना गती देताना नागरिकांवर कर वाढविण्याऐवजी महापालिकेच्या उत्पन्नाचे पर्यायी स्त्रोत मजबूत करण्यावर भर दिला जाईल, समाविष्ट गावांच्या करवाढीचा मुद्दा विशेष सभेद्वारे मार्गी लावण्यात येईल.




### ...सुविधा मिळतील वाटले होते

» समाविष्ट गावांतील मिळकतकर अधिक दराने घेतला जातो. महापालिकेत समाविष्ट झाल्यानंतर सुविधा मिळतील, असे वाटले होते. पण, अनेक पायाभूत सुविधा मिळत नाहीत. समाविष्ट गावांतील कर आकारणीबाबत पुनर्विचार करण्याची गरज आहे. पाचपट मिळकतकर घेतला जातो, हे बदलले पाहिजे. महापालिकेत आलोय, त्यातील एकही अपेक्षा पूर्ण झाली नाही, असे नगरसेवक सुभाष नाणेकर म्हणाले.

### करवसुलीसाठी पुरेशी यंत्रणाच नाही

» राष्ट्रवादीचे गटनेते नीलेश निकम म्हणाले की, करवाढ मागे घेण्यात येत आहे. हा चांगला निर्णय आहे. मात्र, महापालिकेचा उत्पन्नाचा मुख्य सोर्स हा करच आहे. पुणे शहरातील टॅक्स थकीत आहे, तो वसूल करण्यासाठी मनपाकडे पुरेशी यंत्रणा नाही. त्यासाठी मनुष्यबळ उभारले पाहिजे. अधिकृत आणि अनधिकृत बांधकामे, याबाबत टॅक्सदर हेदेखील निश्चित करणे गरजेचे आहे. समाविष्ट गावांतील ग्रामपंचायतींकडून पूर्वी काय टॅक्स लावला जात होता, तो तपासून त्याप्रमाणे टॅक्स लावला पाहिजे.

### विशेष सभेची मागणी

» पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत समाविष्ट गावांतील मिळकतकराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला. या गावांमध्ये करवसुलीला पूर्वी स्थगिती देण्यात आली असतानाही सध्या अभय योजना राबवली जात असल्याने नगरसेवकांनी आक्षेप घेतला. समाविष्ट गावांसाठी नेमलेल्या समितीने कोणत्या शिफारशी केल्या, तसेच मिळकतकर आकारणीची सध्याची पद्धत काय आहे, याची सविस्तर माहिती सभागृहासमोर मांडावी, अशी मागणी करण्यात आली.

# "शपथविधीच्या कठीण प्रसंगी माझ्या डोळ्यासमोर जिजाऊ होत्या"; सुनेत्रा पवारांचा शिवनेरीवर भावनिक खुलासा

## सुनेत्रा पवार यांनी शिवनेरी किल्ला येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त भावनिक भाषण करत जिजाऊंच्या प्रेरणेचा उल्लेख केला

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या प्रमुख उत्सवात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी हजारोंच्या उपस्थितीत हृदयस्पर्शी भाषण दिले. या किल्ल्याच्या ऐतिहासिक भूमीवर बोलताना त्यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताना सामोऱ्या आलेल्या कठीण प्रसंगाची आठवण सांगितली. त्या वेळी त्यांच्या नजरेसमोर छत्रपती शिवाजी महाराजांच्या माता जिजाऊंचे चित्र स्पष्ट उभे होते, असे त्यांनी सांगितले.

"अजित पवार यांनी संपूर्ण आयुष्यभर ज्या फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेच्या पायावर वाटचाल केली, तोच विचार मी कधीही सोडणार नाही, याची मी तुम्हा सर्वांना खात्री देत आहे," असे सुनेत्रा पवार यांनी ठामपणे जाहीर केले. याच शिवनेरी किल्ल्यावर अजित पवार यांनी अनेकवेळा जनतेला संबोधित केले आहे. या ठिकाणाबद्दल त्यांना विशेष जिव्हाळा होता. किल्ल्याचे सुशोभीकरण व्हावे यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले, असेही त्यांनी स्मरण करून दिले.

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्यातील अनेक मंत्री उपस्थित होते. शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशी भरलेल्या या भव्य मेळाव्यात शिवभक्तांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या भाषणाने उपस्थितांना भावनिक क्षण दिले. त्यांनी जिजाऊ मातेच्या त्याग आणि प्रेरणेचा उल्लेख करताना महाराष्ट्राच्या विकासासाठी महायुती सरकार कसे काम करेल, याची रूपरेषा मांडली.

कार्यक्रमात ऐतिहासिक वारसा जपण्याबरोबरच सामाजिक न्याय, शिक्षण आणि विकास यावर भर देण्याचे आश्वासन देण्यात आले. सुनेत्रा पवार यांनी अजित पवार यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची शपथ घेतल्याने उपस्थितांकडून टाळ्यांचा कडकडाट झाला.



### ऐतिहासिक स्थळांवर विकासकामे सुरू

» मागील अर्थसंकल्पात अजित पवार यांनी आग्रा, संगमेश्वर, रायगड आणि वढू बुद्रुक या चार महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांवर विकासकामे सुरू केली होती. या प्रत्येक ठिकाणी भावी पिढीला प्रेरणा मिळेल असा विश्वास सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केला. "महायुती सरकार प्रत्येक घटकाची काळजी घेण्यासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.